




दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २२८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.३१ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## भारताचा मास्टस्ट्रोक, समुद्रात मोठा खेळ, आता होर्मूजमध्ये पाठवणार रिकामे टँकर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, दिल्ली :** युद्धामुळे मध्य पूर्वेत चांगलाच तणाव निर्माण झाला आहे. मध्य पूर्वेत तणाव निर्माण झाल्यामुळे जगातील अनेक बड्या देशांवर सध्या इंधनाचं संकट निर्माण झालं आहे. इंधन टंचाईचा भारताला देखील मोठा फटका बसला आहे. दरम्यान देशातील ऊर्जा संकट दूर करण्यासाठी आता भारतानं मोठा निर्णय घेतला आहे. भारतानं मोठं पाऊल उचललं आहे. सरकार आता मध्य पूर्वेत तेलाचे रिकामे टँकर पाठवणार आहे.

मध्य पूर्वेत रिकामे टँकर पाठवून त्यातून कच्च तेल आणि गॅस भरून आणण्याची योजना सरकारने तयार केली आहे. भारताचं परराष्ट्र मंत्रालय, भारतीय नौदल आणि शिपिंग मंत्रालय यांच्या सयुक्त विद्यमाने हे ऑपरेशन राबवण्यात येणार आहे. आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये देशावर ऊर्जा संकट निर्माण होऊ नये, यासाठी आता भारतानं हा निर्णय घेतला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने आपल्या शत्रू राष्ट्रांसाठी होर्मूजची सामुद्रधुनी बंद केली आहे. मित्र राष्ट्रांच्या जहाजांना या मार्गाने जाण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र जरी परवानगी देण्यात आली असली तरी देखील हा मार्ग युद्धमुळे अतिशय संवेदनशील बनल्यामुळे या मार्गाने युद्धापूर्वी जेवढी वाहतूक सुरू होती, तेवढी वाहतूक सध्या होताना दिसत नाही. युद्धामुळे या मार्गावर भारताचे २४ जहाजं अडकले होते, त्यातील ४ जहाजं भारतामध्ये परतले आहेत, मात्र अजूनही २० जहाजं अडकून पडले आहेत, ज्या जहाजांवर ६०० पेक्षा जास्त भारतीय नाविक आहेत. सरकार सातत्याने इराण आणि इतर देशांच्या संपर्कात आहे. जे जहाज होमूर्ज सामुद्रधुनीमध्ये अडकून पडले आहेत, त्या जहाजांना लवकरात



लवकर सुरक्षितरित्या भारतात आणण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे.

भारतीय नौदलाने ओमानच्या खाडीमध्ये अनेक युद्धनौका तैनात केल्या आहेत. या युद्धनौका भारतीय कच्च्या तेलांच्या जहाजांना सुरक्षा पुरवत आहेत. या नौकांनी थेट होमूर्जच्या सामुद्रधुनीमध्ये प्रवेश केलेला नाहीये. मात्र जेव्हा भारतीय जहाजं तेल आणि गॅस घेऊन युद्धप्रवण क्षेत्रातून बाहेर पडत आहेत, तेव्हा त्या जहाजांना या युद्धनौका सुरक्षा पुरवण्याचं काम करत आहेत. दरम्यान दुसरीकडे आता इराणे चिंता आणखी वाढवली आहे, कारण जो जहाजांचा पारंपरिक रस्ता आहे, त्याने न जाता इराणच्या समुद्र किनाऱ्यांनी जहाजं न्यावेत असं सर्वच देशांना इराणकडून सांगण्यात आलं आहे, त्यामुळे धोका वाढला आहे.

## व्यंकटेश्वर कंपनीला आग!

### दरवर्षी आग लागणे म्हणजे षडयंत्र का?

**अक्षराज : राजकुमार इकडे**



**दि.३०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील, सुपा पंचक्रोशीतील, सुपा औद्योगिक वसाहती लगत नगर-पुणे हायवे लगत पळवे -घानेगाव शिवलगत गट.नं. २६५ पळवे शिवारात व्यंकटेश्वर कंपनी गेली दोन वर्षा पासुन कार्यरत आहे. सदर कंपनी ही पीजी कंपनी, एलजी कंपनी या सारख्या कंपन्यांना माल पुरवत होती.

दि.३० रोजी सकाळी ६ च्या दरम्यान आग लागली, आगीचे प्रमुख कारण समजु शकले नाही. परंतु आग ही मोठ्या स्वरुपाची असुन आग विझवन्यास आग्निशामक दल आपयशी ठरले. असे वास्तव चित्र पहावयास मिळाले.

कंपनीला आग लागल्याने कोणतीही मनुष्यहानी झालेली नाही. सदर कंपनीत मालवहातुक गाड्याची आवक वाढल्याने कंपनीच्या आवारात आग्निशामक दलाच्या गाड्या आग लागलेल्या ठिकाणी पोहचु शकल्या नाहीत, म्हणुन आग्निशामक दल आग विझवण्यास नाकाम झाले, काही कालावधीत आगीचा डोंब वाढत गेला, संपुर्ण कंपनीने पेट घेतला.

विशेष म्हणजे, मागिल वर्षी ह्याच कालावधीत व्यंकटेश्वर कंपनीला आग लागली होती. कोट्यावधी रुपयाची नुकसान झाली होती. सदर कंपनीला आग लावण्याचे षडयंत्र तर नाही ना? असे तेथील शेतकरी, समाज यांच्या बोलण्यातुन येत असल्याचे जानवते.

सदर कंपनीला आग लागल्याने कंपनीतील ५०० च्या वर्ती कामगार हा रोडवर आला असे समजा! आज सकाळी आग लागुन ८ तासाहुन कालावधी उलटुन गेला तरी आग थांबलेली नव्हती. घटनास्थळी पारनेरचे तहशिलदार, सुपा पंचक्रोशीतील अनेक राजकिय नेत्यांनी भेटी दिल्या.

## एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये 'अधीर'च्या विक्रमाची ऐतिहासिक नोंद

### जागतिक पातळीवर चंद्रपूरचा डंका !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** चंद्रपूर शहराच्या क्रीडा इतिहासात अभिमानाची नोंद होईल असा एक प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक सोहळा आज भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजपा महानगर कार्यालय येथे पार पडला. अवघ्या ४.५ वर्षांच्या कोवळ्या वयात आपल्या जिद्द, मेहनत आणि देशप्रेमाच्या जोरावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या चि. अधीर अमृता सुबोध जुन्नावार या उदयोन्मुख स्केटिंग स्टारचा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात आ. किशोर जोरगेवार व अन्य मंचावरील मान्यवरांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. या सोहळ्यास माजी आमदार सुधाकर कोहळे, भाजपा नागपूर पदवीधर मतदार नोंदणी प्रमुख व माजी उपजिल्हाधिकारी सुधीर दिवे, जेष्ठ नागरिक संघ रामनगर, चंद्रपूर तसेच श्री महाकाली माता महोत्सव ट्रस्ट यांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अवघ्या जून २०२५ पासून इनलाईन स्केटिंग या क्रीडा प्रकारात पदार्पण करणाऱ्या अधीरने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती साधत अंडर - ५ गटात चंद्रपूर जिल्ह्यातील एकमेव स्केटिंग खेळाडू म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याच्या मेहनती, सातत्यपूर्ण सराव आणि जिद्दीमुळे तो आज राज्य व राष्ट्रीय स्तरावर झेप घेणारा आशादायी खेळाडू म्हणून उदयास आला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या (२६ जानेवारी) पवित्र दिवशी अधीरने हातात तिरंगा घेऊन गांधी चौक ते जटपुरा गेट हे अंतर अवघ्या ७ मिनिटांत पूर्ण करत देशभक्तीचा प्रेरणादायी संदेश दिला. या अद्वितीय कामगिरीची नोंद ११ मार्च २०२६ रोजी एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकार्ड मध्ये करण्यात आली असून, ही संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाची व ऐतिहासिक बाब ठरली आहे.

अधीरने विविध स्पर्धांमध्ये भाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले असून यंग अचिव्हर्स ऑलम्पियाड मध्ये सुवर्णपदक (प्रथम क्रमांक) मिळवले आहे. तसेच डिसेंबर २०२५ मध्ये नागपूर येथे झालेल्या ओपन टेस्ट लेव्हल कॉम्पिटेशन मध्ये सहभाग नोंदवला, २५ - २६ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपूर येथे झालेल्या नॅशनल चॅम्पियनशिप मध्ये राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली, तसेच डिस्ट्रिक लेव्हल चॅम्पियनशिप (चंद्रपूर) आणि डेली भास्कर स्केटींग कॉम्पिटेशन (नागपूर) मध्येही पदक विजेता ठरला आहे.

अधीरच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याचा विविध स्तरांवर गौरव



**४.५ वर्षांच्या स्केटिंग चॅम्पियनचा भव्य सत्कार...**

करण्यात आला असून माउंट कार्मेल कॉन्वेंट स्कूल येथे फादर बिपीन यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला आहे. तसेच मनोमिलन २०२६ (आर्य वैश्य समाज) कार्यक्रमातही त्याचा सत्कार करण्यात आला असून विविध सामाजिक व शैक्षणिक मंचांवर त्याच्या कर्तृत्वाचा गौरव होत आहे.यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात अधीरच्या जिद्दीचे व कर्तृत्वाचे कौतुक करताना सांगितले की, अधीरसारखा लहानगा खेळाडू आपल्या मेहनतीच्या जोरावर संपूर्ण चंद्रपूरचे नाव उज्ज्वल करत आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. एवढ्या लहान वयात त्याने दाखवलेली शिस्त, आत्मविश्वास आणि देशप्रेम प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. तसेच त्यांनी पुढे जाहीर केले की चंद्रपूर शहरात स्केटिंग खेळाला चालना देण्यासाठी आधुनिक स्केटिंग ग्राउंड उभारण्यासाठी २५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल. अधीरच्या क्रीडा प्रवासात कोणतीही अडचण आल्यास त्याला पूर्ण सहकार्य करण्यात येईल तसेच राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी त्याला आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल, असेही त्यांनी आश्वासित केले.

अधीरचा आत्मविश्वास, शिस्त, सातत्यपूर्ण सराव आणि देशप्रेम हे गुण प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरत असून लहान वय, मोठे ध्येय हा संदेश त्याच्या यशातून स्पष्टपणे दिसून येतो. या सन्मान सोहळ्यामुळे चंद्रपूर शहरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थित मान्यवर व नागरिकांनी अधीरच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

## महाराष्ट्रावर मोठं संकट!
## वादळी वारे गारपीट अन् मुसळधार

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.३०, पुणे :** राज्यावर अवकाळी पावसाचे संकट ओढावले आहे. राज्याच्या विविध भागात पावसाने हजेरी लावली आहे. पुण्यासह राज्याच्या काही भागात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशातच आता हवामान विभागाच्या अंदाजाने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. राज्याच्या कोणत्या भागात कसे हवामान असेल याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**● राज्यातील अनेक भागात अलर्ट जारी**

राज्यातील हवामानाबाबत बोलताना नागपूर हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी म्हटले की, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात गारपीट आणि वादळी वाऱ्या सह पावसाची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यात येलो आणि ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मार्च महिन्यात महाराष्ट्राच्या अनेक भागात तापमान ४० पर्यंत पोहोचलं आहे, मात्र आता एक प्रणाली विकसित झाली असून त्यामुळे महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात पावसाची शक्यता आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांना येलो आणि ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला आहे. या भागात गारपीट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. तीन ते चार दिवस विदर्भासह महाराष्ट्राच्या इतर भागातही अशाच प्रकारची परिस्थिती राहणार आहे. विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तापमान ४२ अंशांपर्यंत पोहोचले होते, मात्र आता पावसामुळे त्यात घट होणार आहे , त्यामुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळणार आहे.

**● मराठवाड्यातही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता**

उद्या मराठवाडाच्या काही जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी गारपीटीची शक्यता आहे. पूर्व विदर्भातील आणि पश्चिम विदर्भातील जास्तीत जास्त जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागात मोठ्या प्रमाणात वादळी वारे वाहणार असून काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. ऑरेंज अलर्ट ज्या भागामध्ये आहे त्या भागात गारपीट मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असते त्यामुळे सावधगिरी बाळगण्याचा इशाराही देण्यात आला आबहे.

३१ मार्चपासून तीन ते चार दिवस पर्यंत हवामानात मोठा बदल दिसून येणार आहे. त्यामुळे विदर्भासह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे पुढील चार ते पाच तारखेपर्यंत अनेक भागात पावसाची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आणि सामान्य नागरिकांनी हवामान विभाग वारंवार देत असलेल्या इशाऱ्याकडे लक्ष देण्याते आवाहन करण्यात आले आहे.

**● पुण्यात मुसळधार पाऊस...**

उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव आणि खेड तालुक्यांमध्ये अचानक हवामान बदलल्याने वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपिटीला सुरुवात झाली आहे. विजांच्या कडकडाटासह आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची मोठी चिंता वाढली आहे. विशेषतः जुन्नर तालुक्यातील प्रसिद्ध शिवनेरी हापूस आंबा पिकाला मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. तसेच भाजीपाला, कांदा, बटाटा आणि इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. अचानक आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हवालदिल झाले असून, झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने मदत देण्याची मागणी जोर धरत आहे.पुण्याच्या भोर तालुक्यात वादळी वाऱ्यासह आणि गारांसह पावसाने हजेरी लावली. भोर तालुक्यातील वडगाव डाळ गावात जोरदार गारांचा पाऊस झाल्याने यात्रेनिमित्त ग्रामदैवताच्या मंदिरासमोर टाकलेला मंडप, गारांच्या वजनाने कोसळला. या अवकाळी पावसामुळे वडगाव डाळ गावातील ७ घरांचे नुकसान झाले आहे. अनेक घरांच्या छतावरील पत्रे, कौल उडाली आहेत. तसेच काही घरांच्या भिंती कोसळल्या आहेत. शासनाने तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

## सुषमा अंधारेंच्या फोटो बॉम्बने खळबळ, थेट दाखवले खरातसोबत केसरकरांचे ते फोटो

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, पुणे :** पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी अशोक खरात प्रकरणात पत्रकार परिषद घेतली आहे. या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी आजही काही फोटो दाखवले आहेत. या फोटोवरून त्यांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांना काही सवाल केले आहेत? जेव्हा केसरकर म्हणतात माझ्याविरोधात कट कारस्थान आहे, तेव्हा मला हा गंभीर आरोप वाटत नाही, तर हे अतिशय बालिश आणि हास्यास्पद वाटतं. दुसरा मुद्दा असा की, दीपक केसरकर म्हणतात ३९ लोक गेले, मग मला एकट्यालाच का टार्गेट करत आहेत? याचा अर्थच असा होतो की केसरकर स्वत: मान्य करतात की होय मी अशोक खरातकडे गेलो होतो, मी त्याच्या संपर्कात होतो, असं अंधारे यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना त्या म्हणाले की, केसरकर म्हणाले माझी चौकशी का करायची? नाहीतर मी सर्वांचा भांडाफोड करेल. मी या पत्रकार परिषदेमध्ये आव्हान करते की केसरकर एकदा भांड फोडाच. जे काही ३९ नावं आहेत ना ती एकदा सांगून



टाकाच, असं आव्हानही त्यांनी यावेळी केसरकर यांना केलं आहे. दरम्यान आज पुन्हा एकदा सुषमा अंधारे यांनी काही फोटो दाखवले आहेत. हे फोटो दाखवताना त्या म्हणाल्या की, मी काल काही फोटो दाखवले होते. ते फोटो दाखवताना असं म्हटलं होतं की, हा एमआयडीसीमधील गेस्टहाऊसमधील फोटो आहे. हा फोटो मी दोन दिवसांपूर्वी देखील दाखवला होता. या फोटमध्ये एक पिवळा शर्ट घातलेला माणूस दिसून येतो, तो माणूस प्रत्येक फोटोमध्ये दिसून येतो. पण हा माणूस दीपक केसरकरांसोबत काय करतो? याचं उत्तर केसरकरांनी दिलं पाहिजे. हा माणूस एक -दोन ठिकाणी नाही तर अनेक ठिकाणी केसरकरांसोबत दिसून येतो. एवढंच नाही तर मी चाकणकरांचा एक व्हिडीओ शेअर केला होता, ज्यामध्ये चाकणकर या खरातची पाद्यपूजा करत होत्या, त्यावेळी देखील हा माणूस खरातसोबत होता. मग हा माणूस कोण आहे? हा माणूस सरखा-सारखा का दिसतो? या मानसाने चाकणकरांचा देखील सत्कार केला होता.

तर या माणसाचं नाव आहे, नामकर्ण एकनाथ आवारे, कोण आहे नामकर्ण एकनाथ आवारे तर जी माहिती मिळते, त्या माहितीनुसार हा जगदंब पतसंस्थेचा प्रमुख आहे. मग जगदंब पतसंस्थेचा प्रमुख दीपक केसरकरांसोबत काय करत होता? मी हे समजू शकते की अशोक खरातला तुम्ही गुरू मानलं असेल, मग तुम्ही ज्यांना गुरू मानलं त्या व्यक्तीसोबत तुम्ही मंदिरात दिसणं मी समजू शकते, त्याच्या पाया पडणंही मी समजू शकते, पण तो नामकर्ण एकनाथ आवारे अशोक खरातसोबत काय करतोय? हा व्यक्ती प्रत्येक ठिकाणी आहे. हा माणूस अजूनही रेकॉर्डवर आलेला नाहीये, आजच्या पत्रकार परिषदेमध्ये मी या माणसाला रेकॉर्डवर आणतीये, असं यावेळी अंधारे यांनी म्हटलं आहे.




## सीलबंद पाण्याच्या बाटल्या किती सुरक्षित ?

एप्रिल महिना सुरूही झाला नसताना राज्याला उन्हाच्या तडाख्याने हवालदिल केले आहे. उन्हाळा आला कि आईस्क्रीम, कोल्ड्रिंक यांचा खप चार पटीने वाढतो. यासोबत सीलबंद पाण्याच्या बाटल्याही मोठ्या प्रमाणात विकल्या जातात. पूर्वी प्रवासाला निघताना सोबत पाण्याचे कंटेनर घेऊनच निघावे लागे आता मात्र जागोजागी, ट्रेनमध्ये, बसमध्ये बसल्या जागी सीलबंद पाण्याच्या बाटल्या १० आणि २० रुपयांत मिळू लागल्या आहेत. सीलबंद बाटल्यांची लोकांना इतकी सवय जडली आहे की बाहेर उपहारगृहात जेवताना किंवा काही अन्नपदार्थ खाताना उघड्यावरील विनामूल्य पाणी पिऊन पोटाला त्रास करून घेण्याऐवजी लोक २० रुपयांची एक लिटरची सीलबंद पाण्याची बाटली विकत घेणे पसंत करतात. आजमितीला केवळ शीतपेयाच्या दुकानांत किंवा उपहारगृहांतच नव्हे तर महामार्गाच्या ठिकाणी पानाच्या टपरीवर, फळांच्या आणि भाज्यांच्या दुकानांतूनही सीलबंद पाण्याच्या बाटल्या विकल्या जाऊ लागल्या आहेत. उन्हाने जीव कासावीस झालेला असताना या थंडगार सिंलबंद पाण्याचा एक घोट जरी घशाखाली उतरला तरी स्वर्गीय सुखाचा अनुभव येतो.

सीलबंद पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्याही गावोगावी तयार होऊ लागल्या आहेत. पारदर्शक प्लास्टिक बाटलीत पाणी भरून त्यावर सील असलेले बूच लावले आणि त्यावर कंपनीचे लेबल चिकटवले कि ती बाटली २० रुपयांना कोणीही विकत घेतात. ज्या बिस्लेरी कंपनीने या सीलबंद पाण्याची संकल्पना लोकांमध्ये रुजवली त्या बिस्लेरी पाण्याच्या बाटल्या आज पाहायला मिळणेही दुरापास्त झाले आहे. बिस्लेरी मागितल्यावर आज दुकानदाराकडून सीलबंद पाण्याची कोणत्याही कंपनीची बाटली हाती थोपवली जाते. या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का ? यांच्या पाण्याची गुणवत्ता शासनाच्या अन्न आणि औषध विभागाने तपासलेली असते का ? यांच्याकडे त्याबाबतचे प्रमाणपत्र असते का ? एसटीने प्रवास करताना दर दोन गावांच्या नंतर वेगळ्या कंपनीची सीलबंद पाण्याची बाटली पाहायला मिळते. लांबच्या प्रवासात रेल्वे डब्यात पाण्याच्या बाटल्या विकणाऱ्यांकडेही अशाच वेगवेगळ्या कंपन्यांच्या पाण्याच्या बाटल्या दिसून येतात. यामध्ये भरले गेलेले पाणी शासनाने नेमून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार शुद्ध केलेले असते का ? सीलबंद २० लिटर पाण्याच्या कंटेनर बाबतही तीच परिस्थिती आहे. आजमितीला अनेक कंपन्या, आस्थापने आणि कार्यालये यांमध्ये कर्मचाऱ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाण्याचे २० लिटरचे कंटेनर मागवले जातात. रिकामे झालेले कंटेनर वॉटर सप्लायर्स घेऊन जाऊन दुसऱ्या दिवशी त्याच कंटेनर्समध्ये पाणी भरून आणतात. ८० ते १०० रुपये प्रति कंटेनर दराने भरून आणलेले हे पाणी शुद्धीकरण प्रक्रिया करून आणलेले असते कि थेट नगरपालिकेच्या नळातून भरलेले असते याची खात्री कोण करतं ? पुन्हा पुन्हा वापर केला जाणाऱ्या या कंटेनर्सना काही वेळा खालून शेवाळे लागलेले पाहायला मिळते, हे कंटेनर्स किती वेळा वापर केल्यावर नष्ट करावेत याबाबत सीलबंद पाणी विकणाऱ्या आणि खरेदी करणाऱ्यांना माहिती असते का ? आज भ्रष्टाचार दिल्लीपासून गल्लीपर्यंत मुरला आहे. सीलबंद पाण्याच्या बाटल्या बनवणाऱ्या कंपन्या याबाबतीत मागे राहतील का ? ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांच्या मोबदल्यात त्यांना दिले जाणारे पाणी शुद्ध नसेल, तर ती केवळ ग्राहकाची फसवणूकच नव्हे, तर ग्राहकाच्या आरोग्यालाही अपायकारक ठरू शकते. सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसांत तहान लागल्यावर आपण जवळपास कुठे थंड पाण्याची बाटली विकत मिळते का ते शोधू लागतो. मिळाल्यावर ती कुठल्या कंपनीची आहे, त्या बाटलीवरील लेबलवर ट्रेडमार्क आहे का ? बाटलीवर एक्सपायरी डेट लिहिलेली आहे का ? लिहिली असल्यास ती उलटून तर गेली नाही ना ? पाणी विकणारी कंपनी शासनमान्य आहे का याबाबत कोणतीही खात्री न करता आपण तिचे बूच उघडून ती तोंडाला लावतो, हे आपण जागरूक ग्राहक नसल्याचेच लक्षण आहे. आरोग्य राखण्यासाठी घेतलेली पाण्याची बाटली आरोग्य बिघडवणारी ठरू नये यासाठी प्रत्येकाने सतर्क राहायला हवे. दिवाळी जवळ आली कि शासनाच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अधिकारी ठिकठिकाणी मिठाईच्या उत्पादकांवर धाडी मारून माव्याची तपासणी करतात. नकली मावा तयार करणाऱ्यांवर कारवाई करतात अशाच प्रकारची तपासणी उन्हाळयाच्या दिवसांत सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्यांच्या कारखान्यांमध्येही करायला हवी !

**- जगन घाणेकर**

# महावीर : अहिंसेचे तेजस्वी दीप

मानवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्त्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्त्वांमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर करणारी, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारी आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्त्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात.

भगवान महावीरांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये वैशालीजवळील कुंडलपूर येथे झाला. बालपणापासूनच महावीरांचा स्वभाव अत्यंत शांत, संयमी आणि करुणामय होता. त्यांना सांसारिक सुखांपेक्षा आत्मिक समाधान अधिक महत्त्वाचे वाटत असे. लहान वयातच त्यांनी समाजातील दुःख, अन्याय आणि विषमता यांचा सखोल विचार केला. त्यांच्या मनात सतत एक प्रश्न घोळत होता की मानवाला खरे सुख कसे मिळेल? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नातूनच त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधनांचा त्याग करून तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय अत्यंत कठीण होता, कारण त्यासाठी त्यांना कुटुंब, संपत्ती आणि सर्व सुखसुविधांचा त्याग करावा लागला. त्यांनी जवळपास बारा वर्षे अत्यंत कठोर साधना केली. या काळात त्यांनी उपास, ध्यान, मौन आणि आत्मसंयम यांचा कठोर अभ्यास केला. अनेक अडचणी, संकटे आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. अखेरीस त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि 'महावीर' म्हणून ओळखले जाऊ लागले.

महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आणि जीवनोपयोगी आहे. त्यांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या पाच तत्त्वांमध्ये संपूर्ण नैतिक जीवनाचा सार दडलेला आहे. अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान आहे. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा टाळण्याचा उपदेश केला नाही, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही दुखावू नये, असा व्यापक संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे.

सत्य हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. महावीरांनी सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी सांगितले की सत्य म्हणजे केवळ खोटे न बोलणे नव्हे, तर न्याय, प्रामाणिकपणा आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. आजच्या समाजात, जिथे असत्य आणि फसवणूक वाढत आहे, तिथे सत्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. परंतु त्याचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंची चोरी टाळणे एवढाच नाही, तर दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण न करणे, अन्यायाने लाभ मिळवू नये, असा व्यापक अर्थ त्यामध्ये अंतर्भूत आहे. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे मानवी जीवनाला संयम आणि संतुलन शिकवतात. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियसंयम, तर अपरिग्रह म्हणजे अनावश्यक वस्तूंचा त्याग. आजच्या उपभोगवादी संस्कृतीत अपरिग्रहाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.


महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. या तत्त्वानुसार कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे सहिष्णुता आणि संवाद यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या समाजात वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत उपयुक्त ठरतो.

महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक सुधारणांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचा विरोध केला. त्यांनी सर्वांना समानतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्मांद्वारे उन्नती साधू शकते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता.

महावीर जयंती हा दिवस या सर्व विचारांचे स्मरण करून देणारा आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, प्रवचने आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात. मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते आणि महावीरांच्या मूर्तीची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी दानधर्म आणि सामाजिक सेवा उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, परंतु मानवी मूल्ये कमी होत चालली आहेत, तिथे महावीरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो. अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचा अवलंब केल्यास समाजात शांतता आणि समन्वय निर्माण होऊ शकतो.

महावीरांच्या शिकवणुकीचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाच्या विविध स्तरांवर त्याचा परिणाम दिसून आला. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसेचा संदेश पुढे अनेक सामाजिक आणि राजकीय चळवळींचा आधार बनला. अहिंसा ही केवळ वैयक्तिक सद्गुण नसून ती समाजव्यवस्थेचा पाया ठरू शकते, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष आचरणातून सिद्ध करून दाखवला.



त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढील अनेक महान व्यक्तिमत्त्वांवरही पडला आणि त्यांनीही अहिंसेचा मार्ग स्वीकारून समाजपरिवर्तनाचे कार्य केले.

महावीरांनी मानवी जीवनाला केवळ बाह्य यशाच्या चौकटीत न मोजता, अंतर्मनाच्या शुद्धतेवर भर दिला. त्यांच्या मते, खरे सुख हे बाह्य संपत्ती, सत्ता किंवा प्रतिष्ठेमध्ये नसून आत्मिक समाधानात आहे. त्यामुळे त्यांनी आत्मसंयम, त्याग आणि साधेपणा यांना विशेष महत्त्व दिले. आजच्या काळात, जिथे माणूस अधिकाधिक भौतिक सुखांच्या मागे धावत आहे, तिथे महावीरांचे हे तत्त्वज्ञान आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडते.

महावीरांच्या तत्त्वज्ञानातील अपरिग्रह हा विचार आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अनावश्यक वस्तूंचा संचय, संसाधनांचा अतिरेक वापर आणि उपभोगवादी जीवनशैली यामुळे पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. जर मानवाने अपरिग्रहाचा मार्ग स्वीकारला, तर नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाईल. त्यामुळे महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ आध्यात्मिक नाही, तर पर्यावरणपूरकही आहे.

त्याचप्रमाणे, अनेकांतवाद हा महावीरांनी दिलेला अत्यंत आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. या तत्त्वानुसार, कोणत्याही विषयाकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे आहे. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या काळात, जिथे मतभेदांमुळे संघर्ष निर्माण होतात, तिथे अनेकांतवाद हा विचार समाजाला एकत्र ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

महावीरांनी स्त्री–पुरुष समानतेचाही संदेश दिला. त्यांनी स्त्रियांनाही आध्यात्मिक प्रगतीची संधी दिली. त्या काळात, जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधनांमध्ये अडकवले गेले होते, तेव्हा महावीरांचा हा विचार अत्यंत प्रगत आणि क्रांतिकारक होता. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

महावीर जयंती साजरी करताना या सर्व विचारांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि प्रवचने होतात. अनेक ठिकाणी मिरवणुका काढल्या जातात. तसेच, दानधर्म, अन्नदान आणि गरजूंना मदत करण्याचे उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या बाह्य विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.

आजच्या आधुनिक युगात, जिथे जीवन अधिक वेगवान आणि स्पर्धात्मक झाले आहे, तिथे माणसामध्ये तणाव, असुरक्षितता आणि असंतोष वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला मानसिक शांती आणि स्थैर्य मिळवण्याचा मार्ग दाखवते. ध्यान, संयम आणि आत्मपरीक्षण यांचा अवलंब केल्यास आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो.

महावीरांचे जीवन आपल्याला हे शिकवते की खरे महानत्व हे बाह्य यशामध्ये नसून आपल्या विचारांमध्ये आणि आचरणामध्ये असते. त्यांनी अत्यंत साधे आणि संयमी जीवन जगले, परंतु त्यांच्या विचारांची उंची अत्यंत महान होती. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृती ही मानवतेच्या कल्याणासाठी होती. त्यामुळेच त्यांचे तत्त्वज्ञान आजही तितकेच प्रेरणादायी आणि उपयुक्त आहे.

महावीर जयंती हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या जीवनात कितपत अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि संयम या मूल्यांचा अवलंब करतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. जर आपण या तत्त्वांचा अंगीकार केला, तर आपण केवळ स्वतःचे जीवन सुधारू शकतो असे नाही, तर समाजातही सकारात्मक बदल घडवू शकतो.

आजच्या काळात, जिथे हिंसा, द्वेष, भ्रष्टाचार आणि असहिष्णुता वाढत आहे, तिथे महावीरांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण शांततेचा, समतेचा आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारू शकतो. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात थोड्याफार प्रमाणातही या तत्त्वांचा अवलंब केला, तर समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो.

शिक्षणक्षेत्रातही महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांचा समावेश शिक्षणात केला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ बौद्धिक विकासच नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक विकासही होईल.

महावीरांचे तत्त्वज्ञान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नाही. ते संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिकता आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा संस्कृतीतील व्यक्तीने त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास त्याचे जीवन अधिक शांत, संतुलित आणि समाधानकारक होऊ शकते.

शेवटी असे म्हणता येईल की महावीर जयंती हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो मानवतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील त्रुटी सुधारण्याची आणि एक चांगले माणूस बनण्याची प्रेरणा देतो. भगवान महावीर यांचे तत्त्वज्ञान हे आजही तितकेच जिवंत आणि उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण एक शांत, समतामूलक आणि नैतिक समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे महावीर जयंती साजरी करताना त्यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## महावीर जयंती

तेवीसावे धर्म रक्षक
तीर्थंकर रे पार्श्वनाथ
चातुर्याम धर्म सांगे
चार तत्वे आत्मसात

ब्रह्मचारी ते महावीर
विश्वासले सत्कर्मात
रूपांतरी करी सार्थ
पंचयामी या धर्मात

चार तीर्थे स्थापियले
तीर्थंकर रे म्हणतात
त्याग प्रेम न् सदाचार
सत्व तत्व जाणतात

अहिंसा सत्य अस्तेय
ठसवे विचार मनात
संयम करूणा शील
प्रसार करती जनात

अनेकांत वादाचा रे
तथ्य आणे विचारात
स्याद्वादाचे पुरस्कार
कृत्य आणे आचारात

सहज समजावे धर्म
अर्धमागधी याभाषेत
महिलांनाहीअधिकार
समाज ये एक रेषात


तितिक्षा क्षमाअहिंसा
गुण रूजवावे अंगात
समता न् त्यागभावना
उजवावे गा अंतरंगात

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकर अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले.

भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला.इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग संयम, प्रेम करुणा, शील व सदाचार



हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## प्रकाश राठोड यांना 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार' जाहीर




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान २०२६' पारनेर तालुक्यातील पळशी ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच प्रकाश बबन राठोड यांना जाहीर झाला आहे. ग्रामीण विकासातील उल्लेखनीय कामगिरी आणि सम जहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. येत्या रविवार, ०५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, सावेडी रोडवरील माऊली संकुल सभागृह, अहिल्यानगर येथे हा भव्य राज्यस्तरीय सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. 'मान कर्तृत्वाचा.. सन्मान नेतृत्वाचा' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या कार्यक्रमात राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत. हा पुरस्कार सोहळा सरपंच सेवा संघाचे मार्गदर्शक बाबासाहेब पावसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाकणे, तसेच रोहित पवार आणि यादवराव पावसे पाटील यांसारख्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाल्यानंतर नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी सरपंच प्रकाश राठोड यांचे अभिनंदन केले आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी पळशी ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नसून, पळशी ग्रामपंचायतीच्या प्रत्येक सदस्याचा आणि ग्रामस्थांचा माझ्यावर असलेल्या विश्वासाचा विजय आहे. 'स्वराज्य सरपंच सेवा संघा'ने माझ्या कार्याची दखल घेतली, याचा मला सार्थ अभिमान आहे. आदर्श गाव घडवण्याचे आमचे ध्येय असून, यापुढील काळातही लोकसहभागातून पळशीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.

**– प्रकाश राठोड (लोकनियुक्त सरपंच, पळशी)**

## माथेरानमध्ये कमर्शियल गॅस पुरवठा पुन्हा सुरू
### कर्तव्यदक्ष अधिकारांमुळे व्यावसायिकांना दिलासा



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.३०, माथेरान :** युद्धसदृश परिस्थितीमुळे देशभरात गॅस व इंधन टंचाईची झळ बसत असताना, माथेरानमध्ये गेल्या १५ ते २० दिवसांपासून कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला होता. त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, धाबे तसेच स्टॉलधारक व्यावसायिकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर विरोधीपक्ष गटनेते सिताराम कुंभार व नगरसेवक सचिन दाभेकर, किरण पेमारे, नगरसेविका अनिता रांजणे व अनुसया ढेबे यांनी तहसील प्रशासनाकडे पत्र देऊन गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती. तहसील अधीक्षक सुरेंद्र सिंग ठाकूर यांनी या मागणीची तातडीने दखल घेत परिस्थितीचा आढावा घेतला व आवश्यक आदेश दिले. त्यानुसार आजपासून माथेरानमध्ये कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला असून टप्प्याटप्प्याने सर्व व्यावसायिकांना गॅस उपलब्ध करून दिला जाणार आहे. प्रशासनाकडून व्यावसायिकांना आवाहन करण्यात आले आहे की, गॅस वितरण प्रक्रियेदरम्यान घाईगडबड करू नये व अफवांवर विश्वास ठेवू नये. सर्वांना गरजेनुसार सिलेंडर मिळतील, अशी हमी देण्यात आली आहे. दरम्यान, गॅस पुरवठा पुन्हा सुरू झाल्याने सर्व स्तरातून तहसील अधीक्षक सुरेंद्र सिंग ठाकूर यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. असे कर्तव्यदक्ष आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांची जाण असणारे अधिकारी माथेरानला लाभल्यास शहराचा सर्वांगीण विकास निश्चित होईल, असा विश्वास स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यक्त केला आहे.

## झेडपी शाळेच्या स्नेहसंमेलनातून चिमुकल्यांच्या गुणांना चालना – धनश्रीताई विखे पा.



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३०, राहुरी (अहिल्यानगर) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये आयोजित केली जाणारी स्नेहसंमेलने ही चिमुकल्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासोबतच त्यांच्या अंगी दडलेल्या सुप्त गुणांना वाव देणारी ठरत आहेत, असे प्रतिपादन रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा धनश्री सुजय विखे पा.यांनी केले. तालुक्यातील चिंचोली येथील भटारकरवस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित स्नेहसंमेलन प्रसंगी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शोभाताई लाटे होत्या. यावेळी पद्मश्री विखे पा. साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सोपान शिरसाठ, गटशिक्षणाधिकारी मोहनीराज तुंबारे, कारखान्याचे संचालक बाळासाहेब लाटे, धनंजय आहेर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, नाटिका, देशभक्तीपर गीते तसेच समूह सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची झलक दाखवली. पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत दाद दिली.यावेळी शैक्षणिक, क्रीडा व विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना पुढील वाटचालीस प्रेरणा मिळाली.या स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असून शाळा, पालक व समाज यांच्यातील नाते अधिक दृढ होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.प्रसंगी काळे पा. विद्यालयाचे मुख्याध्यापक भिमराज चिंधे, स्कूल कमेटीचे अध्यक्ष शंकर लाटे, विकास संस्थेचे अध्यक्ष गिताराम पठारे, रायभान नलगे, विलास लाटे, संजय लाटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय लाटे, उपाध्यक्ष विनोद चोखर, यशवंत लाटे, सुधीर गागरे, मधुकर त्रिभुवन, नितीन वडितके, अविनाश माळी आदींसह बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मगरे, उपाध्यापक अंत्रे तसेच श्रीमती वासाल, मरभळ, लखापती, पठारे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दत्तात्रय लाटे यांनी केले.

# क्रीडा क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग ही प्रगतीची नांदी – आ.जोरगेवार
## भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने महिलांची खुली कबड्डी स्पर्धा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** महिला केवळ घरापुरत्या मर्यादित न राहता क्रीडा क्षेत्रातही आत्मविश्वासाने पुढे येत आहेत, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. श्री माता महाकाली क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून महिलांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या सर्वांगीण विकासाला नक्कीच चालना मिळेल, क्रीडा क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग ही प्रगतीची नांदी आहे. असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने बाबूपेठ येथील श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी मैदानात जिल्हास्तरीय रात्रकालीन महिलांची खुली कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते सदर कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला बिग बॉस मराठी सीजन ६ आणि जाऊ बाईच्या घरात फेम अभिनेत्री संस्कृती साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून, ती कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. यावेळी सिनेट सदस्य शुभांगी नक्षीने-उंबरकर, माजी महापौर राखी कंचर्लावार, मनपा स्थायी समिती सभापती मनस्वी गिर्हे, कल्याणी किशोर जोरगेवार, गटनेते चंद्रशेखर शेट्टी, नगरसेवक सुभाष कासनगोट्टुवार, नगरसेविका सविता कांबळे, सायली तोंडरे, विधानसभा अध्यक्ष वंदना हातगावकर, विमल काटकर, कौसर खान, नगर सेविका शीतल गुरुनुले, पुष्पा उराडे, राजलक्ष्मी कारंगल, ॲड. सारिका संदुरकर, आशा देशमुख, ज्योती जिवने, अनुजा कुलसंगे, डिलन केळझरकर आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, श्री माता महाकाली क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून महिलांना एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कबड्डीसारख्या पारंपरिक खेळात महिलांचा वाढता सहभाग पाहून विशेष समाधान वाटते. पूर्वी महिला केवळ घरापुरत्या मर्यादित राहायच्या; मात्र आज शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि क्रीडा यांसारख्या प्रत्येक क्षेत्रात त्या आत्मविश्वासाने पुढे येत आहेत. हा सकारात्मक बदल आपल्या समाजाच्या प्रगतीचे द्योतक आहे.

क्रीडा ही केवळ स्पर्धा नसून, ती शिस्त, संघभावना, जिद्द आणि आत्मविश्वास शिकवते. आज या मैदानावर उतरलेल्या प्रत्येक खेळाडू भगिनीमध्ये हीच ऊर्जा आणि जिद्द दिसून येत आहे. तुमच्यातील ही जिद्दच तुम्हाला पुढे मोठ्या यशापर्यंत घेऊन जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमात अभिनेत्री संस्कृती साळुंखे यांची उपस्थिती लाभली. त्यांनी अभिनय क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला असून, त्यांच्या उपस्थितीमुळे खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळेल, असेही ते म्हणाले. श्री माता महाकाली क्रीडा महोत्सवाचा उद्देश केवळ स्पर्धा आयोजित करणे नसून, समाजातील प्रत्येक घटकाला विशेषतः महिलांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी देणे हा आहे. या माध्यमातून अनेक प्रतिभावान खेळाडू पुढे येतील आणि भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी कबड्डी स्पर्धा पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींनी मोठी गर्दी केली होती.

# श्री साई पालखी शोभायात्रेत जनसागर उसळला

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** भानेगावातील श्री साई मंदिराचा वर्धापन दिन व पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. श्री साई वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित शोभायात्रेत हजारोच्या संख्येत जनसागर उसळला होता. शोभायात्रेचे मुख्य आकर्षण महाकाय हनुमानजी व गोरिला आणि वानर सेना ठरली. दिनांक२९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री साई पालखी सोहळा व भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर, सरपंच शालिनी चवरे, पिंकी चिखले, प्रियंका उपासे, रविंद्र चिखले, अनेश चवरे, आशिष उपासे, डोमाजी निखाडे, क्रिष्णा चिकनकर, श्यामराव सरोदे, रामेश्वर ढोके यांच्या हस्ते आरती व श्री साई पालखीची विविधत पूजा अर्चना करण्यात आली.यावेळी सुनील जालंदर, राजू येलमुले, बापू शिंदूरकर, नामदेव ढोके, निळकंठराव शिंदूरकर, नितीन मोहिते, शंकर बोढे, वसंता ढोके, अंकुश ढोके, सतीश शिंदूरकर, योगेश जालंदर यांच्यासह शेकडो भाविक उपस्थित होते.शोभायात्रा साई मंदिर, शिक्षक कॉलनी, उपासे ले आऊट, नविन बिना, प्रकाशनगर कॉलनी, राम मंदिर, पोलीस स्टेशन, रेल्वे चौकी, मुख्य बाजारपेठ, अन्नामोड आदि परिसरातून भ्रमण करून साई मंदिर भानेगाव येथे समारोप करण्यात आला.



महाकाय हनुमान व गोरिला ठरले आकर्षणाचे केंद्र

शोभायात्रेत श्री साईबाबा, राम, लक्ष्मण, सीता, हनुमान, राधा कृष्ण, विठ्ठल रुख्मिनी, शंकर पार्वती, महाकाली, भैरव, दुर्गादेवी, सरस्वती माता, यांच्यासह शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, बाजीराव पेशवे, झाशी राणी, जीजा माता, मावळे, हनुमानजी, गोरिला आदी सजीव पात्र सामील करण्यात आले होते. शोभायात्रेत ११ घोडे, १० डिस्को लाईट बग्गी, सरकार बँड, डीजे साऊंड, आकर्षक रोषणाई व भजन मंडळ आदी सामील करण्यात आले होते. यादरम्यान शोभायात्रेचे ठीकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले सामाजिक व राजकीय राजकीय संघटनाकडून शरबत, पाणी, आलूभात, लस्सी, मठ्ठा, बुंदी, कुल्फी, आईस्क्रीम आदि वितरण करण्यात आले शोभायात्रा मार्गावर शेकडोंच्या संख्येत नागरिकांनी दुतर्फा गर्दी केली.

यावेळी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी महेंद्र चटप, पारस चिकनकर, संकेत पापडकर, पियुष चिकनकर, तन्मय ढोके, पार्थ शिंदूरकर, यश चिकनकर, अथर्व बोकडे, भावेश ढोके, प्रथमेश येलमुले, दिपांशू शिंदूरकर, आशु भोयर, हेमंत चिकनकर, वंश शिंदूरकर, अभिषेक ढोके, आदींनी प्रयत्न केले.

# सोयगाव येथे भव्य हिंदू संमेलन संपन्न; नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२९, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** हिंदूंच्या एकजुटीवरच भारताचे भविष्य अवलंबून आहे. हिंदूंनी इतिहासापासून धडा घ्यावा. आपल्याला शत्रू बोध समजून घ्यावा लागेल. छत्रपती शिवरायांनी, धर्मवीर शंभूराजांनी धर्म रक्षणाचे कार्य केले. त्यांचे शत्रू कोण होते हे आपल्यापासून लपविण्यासाठी प्रयत्न झाले. हिंदूंना एकजूट होण्यापासून रोखणाऱ्या शक्तींना ओळखा. जगात ख्रिश्चनाचे देश असलेले चालतात, मुस्लिमांचे धर्माच्या आधारावर असलेले देश चालतात आणि आम्ही हिंदुराष्ट्र म्हटले की काहींच्या पोटात दुखते. हे कदापि सहन होणार नाही.

भारत हे हिंदुराष्ट्र आहे. हिंदूंच्या एकजुटीवरच भारताचे भविष्य अवलंबून आहे असे प्रतिपादन हिंदुत्ववादी व्याख्याते आशुतोष झा यांनी केले. ते सोयगाव येथील सकल हिंदू समाज आयोजित हिंदू संमेलनात बोलत होते.





सकल हिंदू समाजातर्फे सोयगाव येथे सर्व जाती, पंथ, संप्रदाय, गणेश मंडळ, दुर्गा मंडळ व विविध भक्त परिवाराच्या समन्वयाने भव्य हिंदू संमेलन संपन्न झाले.

हिंदू संमेलनात पाल येथील पूज्य संत गोपाल चैतन्य बाबाजी, श्री गिरनारी मठाचे स्वामी ब्रह्मानंद, मथुरा येथील वात्सल्य आश्रमाच्या आदरणीय सारिका ताई मिसाळ, ह.भ.प. कु.जान्हवीताई सोनवणे, उपाख्य माता यशोदा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गोरक्षनाथ आबुज उपस्थित होते. सोयगाव येथील शेंदुर्णी बायपास रोडवर भव्य हिंदू संमेलन पार पडले. सोयगाव पंचक्रोशीतील हजारो हिंदू बांधवांनी या संमेलनास उत्स्फूर्त उपस्थिती लावली.

या कार्यक्रम प्रसंगी कल्पेश जोशी यांनी प्रास्ताविक सादर केले, हर्षल हिंदू यांनी सूत्र संचालन केले तर सुधन्वा केणेकर यांनी आभार व्यक्त केले. संमेलनाच्या सुरुवातीला सामूहिक हनुमान चालीसा पठण करण्यात आले. त्यानंतर दीप प्रज्वलन करून संमेलनाची सुरुवात झाली. तर वंदे मातरम् गायनाने समारोप करण्यात आला.हिंदूच्या शक्तीचा संचय करण्यासाठी हिंदू संमेलन. संमेलन कोणाच्या विरोधात नाही. कोणाच्या प्रतिक्रियेत नाही. आपल्या समाजातील गुण आणि दोष माझेच आहे हे समजण्यासाठी हे संमेलन आहे असे प्रतिपादन गोरक्षनाथ आबुज यांनी केले.

स्वामी ब्रह्मानंद यांनी धर्म म्हणजे काय हे समजावून सांगितले. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे आपल्या सनातन धर्माचे चार महत्वाचे स्तंभ आहेत व ते आपण समजून घेतले पाहिजे असे त्यांनी सांगितले. तर पूज्य गोपाल चैतन्य बाबा यांनी उपस्थित समाजाला आशीर्वाद देऊन ज्या सत्कार्यासाठी हे संमेलन आयोजित केले आहे त्याची यशस्विता नक्की होईल असे सांगितले.

तसेच सोयगावच्या भूमी कन्या सारिकाताई मिसाळ उपाख्य यशोदा माता यांनी हिंदूंच्या कुटुंबात संवाद वाढवा आणि तरुणींना लव जिहादपासून सावध राहण्याचे आवाहन केले.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी ईव्हीएम सरमिसळ पूर्ण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, अहिल्यानगर :** राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीनची प्रथम सरमिसळ प्रक्रिया आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली हा टप्पा पूर्ण करण्यात आला. प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण झालेल्या मशीनचे प्रत्यक्ष वाटप करण्यासाठी ही सरमिसळ केली जाते. भारत निवडणूक आयोगाच्या प्रणालीद्वारे विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर ही प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली. यानंतर राहुरी मतदारसंघासाठी निश्चित केलेल्या मशीनच्या याद्या जिल्हा मुख्यालयात सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना दिल्या जातील.

निवडणुकीच्या कामकाजासाठी या मशीन राहुरी मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केल्या जातील. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत या सर्व मशीन राहुरी येथील स्ट्रॉंग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात येणार आहेत. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर सर्व संबंधित उमेदवारांनाही या सरमिसळ झालेल्या मशीनची यादी दिली जाईल.

# साहित्यविश्वात पहिल्यांदा विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, पुणे :** शामला पंडित दीक्षित यांच्या प्रणाली प्रकाशन, चिंचवड आणि न्यू इंग्लिश स्कूल, माण यांच्या संयुक्त विद्यमाने लेखिका कल्पना चांदमल बंब यांच्या 'शब्दांशी जोडले नाते' या पुस्तकाचे प्रकाशन नुकताच न्यू इंग्लिश स्कूल, माण विद्यालयात करण्यात आला.

पुस्तक प्रकाशनाच्या अध्यक्षस्थानी मिसबाह शफिक खान (इयत्ता ११ वी) होत्या. प्रमुख अतिथी रेश्मा राकेश प्रजापती (इयत्ता ११ वी) अर्पिता भाऊराव पवार (इयत्ता ९ वी) या विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी प्रणाली प्रकाशनच्या शामला पंडित (दीक्षित), न्यू इंग्लिश स्कूल, माण विद्यालयाचे मुख्याध्यापक अंबादास रोडे, ज्येष्ठ साहित्यिक नारायण कुंभार, लेखिका कल्पना बंब व्यासपीठावर विद्यार्थ्यांसमवेत होते. तुळशीला पाणी घालून, गणेश स्तवन म्हणून आणि विद्यार्थ्यांच्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्तविक लेखिका कल्पना बंब यांनी केले.

यावेळी त्या म्हणाल्या की, 'आजच्या मोबाइल आणि इंटरनेट युगात वाचनसंस्कृती लोप पावू लागली आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लागावी यासाठी प्रकाशित होणारे 'शब्दांशी जोडले नाते' हे पुस्तक प्रकाशनापूर्वीच ज्या विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन होणार आहे त्यांना देण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रकाशित होणारे पुस्तक वाचले आहे. वाचन संस्कृतीचा जागर व्हावा म्हणून विद्यार्थ्यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन करण्याची संकल्पना राबवली. यावेळी संतसाहित्याचे अभ्यासक अशोक महाराज गोरे, सुरेश कंक, राधाबाई वाघमारे, अमरदीप मखामले, विलास कुंभार उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्ष मिसबाह खान म्हणाल्या, ''शब्दांशी जोडले नाते' या पुस्तकातून कल्पना बंब यांनी समाजाचे ज्वलंत प्रश्न आणि त्यांची उत्तरे याचे विवेचन अचूकपणे केले आहे.

मन, शब्द, जीवन, समाधान, सणांचे महत्त्व, स्त्री समस्या हे सारे लेख माणसाला अंतर्मुख करतात. पानापानातून नवा विचार घडू दे आमच्या



अंधारमय जीवनाला तुमच्या लेखणीतून तेज मिळू दे! 'शब्दांशी जोडले नाते' हे पुस्तक घराघरांत पोहचू दे! मराठी साहित्याचा सुगंध पूर्ण जगात पोहचू दे!' असे विचार मांडले. रेश्मा प्रजापती यांनी, 'शब्दांशी नाते कसे जोडावे हे या पुस्तकातून कळते. शालेय विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचली पाहिजेत. मनन, चिंतन केले पाहिजे. पुस्तके वाचल्याने विचार प्रगल्भ होतात. पुस्तके वाचली तर आजचे विद्यार्थी उद्याचे लेखक होतील!' असे विचार मांडले. अर्पिता पवार या विद्यार्थिनीने, 'आपण पुस्तके वाचली तर त्यातून करुणा, आनंद, कष्ट, यश, बंधुत्व यांच्या जाणिवा समृद्ध होतात. सकारात्मक विचार करण्याची प्रेरणा पुस्तकातून मिळते!' असे मत व्यक्त केले. कवयित्री राधाबाई वाघमारे आणि कवी विलास कुंभार यांनी कविता सादर केल्या. साहित्यिक नारायण कुंभार, अंबादास रोडे, प्रकाशिका शामला पंडित (दीक्षित )यांनी मनोगत व्यक्त केले. प्रणाली प्रकाशन चे हे ५७ वे पुस्तक आहे .पूजा बंब, कीर्ती मुथा, छाया सुराणा, संदीप ओसवाल, श्रीकांत सुराणा, खनक मुथा, मितांश मुथा, गोकुळ गायकवाड, संभाजी थिटे, विजय भांगरे, शुभम गायकवाड, शीतल टकले, साधना कानडे, मनीषा मोरे, ज्योती गायकवाड, बाळासाहेब जाधव, सुदाम केळकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. सीमा गांधी यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. सुभाष चव्हाण यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आ.मुनगंटीवार यांनी शिक्षक परिषदेत मांडला संवाद, संघर्ष आणि समाधानाचा त्रिसूत्री दृष्टिकोन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नागपूर विभागाच्या विदर्भ विभागीय अधिवेशनाला संबोधित केले. यावेळी त्यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर भाष्य करत 'संवाद, संघर्ष आणि समाधान' या त्रिसूत्री दृष्टिकोनाची स्पष्ट मांडणी केली. शिक्षकांच्या न्याय्य मागण्या तसेच बदलत्या शैक्षणिक आणि तांत्रिक आव्हानांचा विचार करत, संवादाच्या माध्यमातून तोडगा शोधण्याला प्राधान्य दिले पाहिजे; मात्र आवश्यकतेनुसार संघर्षाचीही भूमिका स्वीकारत शेवटी समाधानाकडे वाटचाल करणे गरजेचे आहे, असे त्यांनी ठामपणे अधोरेखित केले.

चंद्रपूर येथील राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, नागपूर विभागाच्या विदर्भ विभागीय अधिवेशनाचे अध्यक्ष अजय वानखेडे, माजी शिक्षक आमदार नागो गाणार, माजी आमदार सुधाकरराव कोहळे, राज्य अध्यक्ष वेणुनाथ कडू, पूजाताई चौधरी, सुभाष गोतमारे, विलास खोंड, विनोद पांढरे, रंजनाताई कावळे कार्यक्रमात मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षिका आदींची उपस्थिती होती.

चंद्रपूर ही माता महाकालीची पावन भूमी असून, या भूमीतून प्रेरणा,




सेवा आणि पराक्रमाची ऊर्जा घेऊन शिक्षकांनी समाजात परिवर्तन घडवावे, अशी अपेक्षा आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. जगातील १९३ देशांपैकी केवळ १४ देशांत वाघ आहे आणि त्यातील सर्वाधिक वाघ भारतात असून त्यामध्ये देशात सर्वात जास्त वाघ चंद्रपूर जिल्हात आहे, याचा उल्लेख करत त्यांनी शिक्षकांनीही वाघाच्या धैर्याने आव्हानांना सामोरे जावे, असे आवाहन केले.

चंद्रपूर जिल्ह्याच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख करताना आ. मुनगंटीवार म्हणाले की, आनंदवनासारख्या सेवा कार्याच्या प्रेरणास्थानामुळे आणि चंद्रपूर येथील थर्मल पॉवर प्रकल्पामुळे राज्यातील अंधार दूर करणारी ही भूमी एक वेगळी ओळख निर्माण करते. या जिल्ह्याच्या प्रेरणेतून अधिवेशनातून जाताना शिक्षण क्षेत्रातील अंधार दूर करण्याचा प्रयत्न प्रत्येकांनी करावा असे आवाहन त्यांनी केले.

इतिहासातील चंद्रपूर जिल्ह्याच्या योगदानाचा उल्लेख करताना त्यांनी भारत-चीन युद्धाच्या काळात सर्वाधिक सुवर्णदान करणारा जिल्हा म्हणून चंद्रपूरची ओळख अधोरेखित केली. या जिल्ह्याचे हृदय सोनेरी असल्याचे सांगत, येथून शिक्षकांनी सेवाभाव, संवेदनशीलता आणि राष्ट्रहिताचा संस्कार घेऊन जावे, अशी भावनिक अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. बदलत्या काळात दर काही वर्षांनी नवी आव्हाने उभी राहत असून आजच्या युगात तंत्रज्ञान विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) शिक्षण क्षेत्रावर प्रभाव टाकत आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आवश्यक असला तरी त्याच्या आहारी न जाता संस्कार, मूल्ये आणि मानवी संवेदनांचा आधार कायम ठेवणे गरजेचे आहे, असे आ.मुनगंटीवार म्हणाले.

मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव या मूल्यांना जपताना यंत्र देवो भव होऊ नये, यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षक परिषद ही संघटना नेहमी व्यक्तीहितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देणारी असून पहिले राष्ट्रहित, नंतर परिषद आणि शेवटी मी या तत्वावर कार्य करत असल्याचे सांगत, शिक्षक परिषदेच्या प्रत्येक न्याय्य मागणीसाठी आपण खंबीरपणे उभे राहू, असा विश्वास आ.मुनगंटीवार यांनी दिला.

**राज्यमंत्र्यासोबत शिक्षण समस्यांवर बैठक**

शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी लवकरच चंद्रपूर येथील प्रियदर्शिनी सभागृहात शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण विभागाचे सचिव श्री. देओल, शिक्षण क्षेत्रातील अधिकारी आणि सर्व संबंधितांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

**शिक्षकांची भूमिका महत्वाची...**

शिक्षकांमधील एकता, आपुलकी, सहकार्य आणि मानवतेची भावना जपण्याचे आवाहन करत, शिक्षण हा केवळ व्यवसाय नसून संस्कार घडविण्याचे पवित्र कार्य आहे, हा भाव कायम ठेवण्याचे आ.मुनगंटीवार यांनी सांगितले. पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# जेष्ठ अभिनेते मकरंद अनासपुरेंची प्रार्थना फाऊंडेशनला भेट

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.३०, सोलापूर :**

प्रार्थना फाऊंडेशनच्या माध्यमातून मोरवंची (ता. सोलापूर) येथे अनाथाश्रम व वृद्धाश्रम चालविण्यात येत असून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुले, वंचित, अनाथ, निराधार तसेच भिक्षा मागणाऱ्या मुलांचा आणि अनाथ, निराधार, बेघर वृद्ध आजी-आजोबांचा सांभाळ केला जातो. या समाजोपयोगी प्रकल्पाला भेट देण्यासाठी सुप्रसिद्ध व जेष्ठ सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी प्रार्थना फाऊंडेशनला भेट दिली.

यावेळी त्यांनी आश्रमातील मुलांशी तसेच वृद्ध आजी-आजोबांशी संवाद साधला. मुलांनी अभ्यास करावा, कष्ट करावे आणि सक्षमपणे स्वतःच्या पायावर उभे राहावे, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. त्यांच्या या प्रेरणादायी भेटीमुळे आश्रमातील मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, प्रार्थना फाऊंडेशनच्या माध्यमातून आणि अविरत फाऊंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विषमुक्त सेंद्रिय शेती प्रकल्पाचे उद्घाटन मकरंद अनासपुरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विशेष म्हणजे त्यांनी



स्वतः पहिले ग्राहक बनून विषमुक्त भाजीपाला विकत घेतला.

यावेळी त्यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, आरोग्यदायी जीवनासाठी विषमुक्त अन्न महत्त्वाचे आहे. प्रार्थना फाऊंडेशनच्या या उपक्रमातून तयार होणारा भाजीपाला नागरिकांनी खरेदी करावा आणि विषमुक्त अन्नाच्या दिशेने योग्य पाऊल टाकावे.

या कार्यक्रमाला मोरवंचीचे सरपंच सूर्यभान धोत्रे, शिरापूरचे उपसरपंच सौदागर साठे, अमोल सावंत, प्रार्थना फाऊंडेशनच्या सचिव अनु मोहिते, समाधान वडने, विष्णू भोसले, शुभम मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रार्थना फाऊंडेशनच्या या उपक्रमामुळे समाजसेवा आणि आरोग्यदायी शेती यांचा संगम साधला जात असून भविष्यात हा प्रकल्प अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## थोडक्यात

### नीलगाईंची पाण्यासाठी जंगलात वणवण



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.३०, शहापूर (ठाणे) :** उन्हाळा सुरू होताच वनव्यांच्या घटना वाढू लागल्या असून जंगलाच्या ऱ्हासाचे हे एक मोठे कारण ठरत आहे. या आगींमध्ये मौल्यवान वनसंपदा, दुर्मिळ औषधी वनस्पती आणि निरपराध वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. जंगलात लागलेल्या आगीत सरपटणारे प्राणी, पशुपक्षी तसेच पक्ष्यांची अंडी व पिल्ले जळून मृत्यूमुखी पडत आहेत. परिणामी वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर गंभीर परिणाम होत आहे.वनव्यांमुळे हिरवागार चारा, झाडे-झुडपे जळून खाक होत असल्याने तृणभक्षी प्राण्यांसमोर चारा व पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अन्न आणि पाण्याच्या शोधात हे प्राणी जंगल सोडून मानवी वस्तीकडे वळत असल्याचे चित्र दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर डोळखांब वनपरिक्षेत्रातील कांबे गावाच्या जंगलात निलगायींचा कळप चारा व पाण्यासाठी वणवण करताना दिसून आला आहे. ही परिस्थिती चिंताजनक असून वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. वन विभागाने याची तात्काळ दखल घेऊन वन्यजीव, पशुपक्षी आणि तृणभक्षी प्राण्यांच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, वन्यजीव मानवी वस्तीत घुसण्याचे प्रमाण वाढून मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### कुंडलवाडीतील पानदन रस्त्याला मंजुरी; ९० दिवसांत दिलेला शब्द पूर्ण

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.३०, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला पानदन रस्ता अखेर मंजूर होऊन प्रत्यक्षात साकार होण्याच्या मार्गावर आला आहे. निवडणुकीपूर्वी दिलेला शब्द अवघ्या ९० दिवसांत पूर्ण करून नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी आपली कर्तव्यदक्षता पुन्हा सिद्ध केली आहे. या कामासाठी नगराध्यक्षा यांच्यासह नगरसेवक प्रदीप खेळगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच मा. मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण, राज्यसभेचे खासदार डॉ.अजित गोपछडे आणि आमदार जितेश अंतापूरकर यांच्या सहकार्यामुळे या रस्त्याला मंजुरी मिळण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

दरम्यान, हा प्रश्न सातत्याने प्रशासनापुढे मांडणारे शेतकरी अनिल पेंटावार यांनी या मागणीसाठी विशेष प्रयत्न केले होते. त्यांच्या पाठपुराव्यामुळे आणि लोकप्रतिनिधींच्या सहकार्यामुळे अखेर शेतकऱ्यांचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार झाले आहे. आज या पानदन रस्त्याचे नारळ फोडून उद्घाटन करण्यात आले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार स्थानिक शेतकरी व नागरिक ठरले. या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, शेतीसाठी वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. यामुळे सर्वत्र समाधान व्यक्त होत असून, नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी असेच काम पुढेही सुरू राहावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. यावेळी गजानन कोटलावार, नगरसेवक तथा गटनेते रमेश ईरलावर, नगरसेवक प्रदीप खेळगे, नगरसेवक शेख मुक्तर, नगरसेवक संजय गोनेलवार, नगरसेवक गंगाधर कोटलवार, नगरसेविका प्रतिनिधी संजय खुळगे, तसेच माजी तहसीलदार नरसिंह चव्हाण, माजी तलाठी गंगाधर खेळेगे, गंगाधर मलकुवार, हनुमंत मुंगीलवार, रमेश पेंटावार, अनिल पेंटावार, जयप्रकाश कमटलवार, भूषण कोलंबरे, गंगाधर दुसलवाड सर्व शेतकरी बांधव आदी उपस्थित होते.

### बेपत्ता युवकांचा मृतदेह तलावात आढळला

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.३०, चिमूर (चंद्रपूर) :** चिमूर येथील बालाजी सागर तलावामध्ये एका बेपत्ता युवकाचा मृतदेह आज सोमवारी दि.३०, मार्च २०२६ रोजी सकाळी पाण्यावर तरंगताना आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारपासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीबाबत रविवार २९ मार्च रोजी चिमूर पोलीस स्टेशन येथे हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. आज सोमवार (दि.३०) मार्च रोजी सकाळच्या सुमारास तलाव परिसरात काम करणाऱ्या मजुरांना पाण्यावर एक मृतदेह तरंगताना दिसून आला. त्यांनी तात्काळ याची माहिती पोलिसांना दिली. घटनास्थळी पोलीस दाखल होताच पंचनामा करण्यात आला. मृत व्यक्तीच्या खिशात आढळलेल्या आधार कार्डवरून त्यांची ओळख राकेश पत्रु डांगे (वय २६, रा. उरकुडपार) अशी पटली. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमोद पढाल, संपत पुलिपाका चिमूर पोलीस करीत आहेत.

### उमेदच्या मार्गदर्शनात माही अक्का सेंटरचे भव्य उद्घाटन संपन्न

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.३०, चिमूर (चंद्रपूर) :** उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, समता महिला प्रभाग संघ खडसंगी यांचे आर्थिक सहायाने मौजा सावरी (बीड) येथील नागरिकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक अक्का सेंटरचे आज मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी अर्चना बोनसुले तालुका अभियान व्यवस्थापक यांचे हस्ते फीत कापून केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या नव्या अक्का सेंटरमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची अत्याधुनिक यंत्रणा, जलशुद्धीकरण प्रणाली तसेच नागरिकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

यामुळे परिसरातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पाणी सहज उपलब्ध होणार आहे. उद्घाटन समारंभाला सरपंच लोकनाथ रामटेके, सुरेश धारने प्र. सहा. हेमचंद बोरकर प्रभाग समन्वयक, वंदना गुढधे प्रभागसंघ अध्यक्ष, संगीता मेश्राम प्रभाग संघ सचिव, पुंडलीक गेडाम लश्रा, शीतल थुटे लश्रषा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रमुख पाहुण्यांनी या प्रकल्पामुळे परिसराच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार भरती सातपैसे पशुसखी यांनी मानले आणि सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.